अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | बुधवार
०८.०७.२०२६

वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १५८ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### कौटुंबिक वादातून पत्नीवरच ३ गोळ्या झाडल्या : आरोपी पती फरार

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**नांदेड** – जिल्ह्याच्या लोहा शहरातील शिक्षक कॉलनी परिसरात सोमवारी मध्यरात्री कौटुंबिक वादातून पतीने स्वतःच्या पत्नीवर गावठी कट्टयातून तब्बल तीन राऊंड गोळीबार केल्याची धक्कादायक घटना घडली. या प्राणघातक हल्ल्यात पत्नी गंभीर जखमी झाली असून, तिच्यावर नांदेड येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेतपोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू असून गोळीबाराच्या घटनेतील जखमी पत्नीची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी विशाल जाधव आणि त्याची पत्नी अर्चना यांच्यात सोमवारी मध्यरात्री कडाक्याचे भांडण झाले.

---

मिसिंग लिंक इंजिनिअरिंग मार्व्हलच

# महाराष्ट्राची बदनामी करणाऱ्यांना सोडणार नाही

### देवेंद्र फडणवीस सभागृहात संतापले

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – मिसिंग लिंकवर दरड कोसळल्यानंतर काही लोकांनी सरकारवर अवाजवी टीका केली. एक कोटी खोटारडे लोक मेल्यानंतर हे लोक पैदा झाले असतील.

त्यांना खोटं बोलायला लाजही वाटत नाही. मात्र, या सगळ्यांच्या नाकावर टिच्चून सरकारने १८ तासांत मिसिंग लिंकवरील वाहतूक पूर्ववत केली. भविष्यात मिसिंग लिंकवरुन आमच्यावर टीका करणारे शिल्लक राहणार नाहीत.

पण १० वर्षांनी मिसिंग लिंक असेल, देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदेंचं नाव असेल. मला बदनाम करा पण महाराष्ट्राला बदनाम करु नका, अशा आक्रमक भाषेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीकाकारांना प्रत्युत्तर दिले. ते बुधवारी विधानसभेत बोलत होते.

यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी मिसिंग लिंकवरुन टीका करणाऱ्यांचा चांगलाच समाचार घेतला. ज्यांना कुत्रा नाही विचारत, ते आज सोशल मीडियावर येऊन सगळ्यांना शिव्या देत आहेत. असे भाड्याचे तट्टू मिसिंग लिंकबाबत पैसे घेऊन सोशल मीडियावर लिहत होते. या सगळ्यांना मी एकच सांगतो की, महाराष्ट्राचा अपमान कराल तर मी सोडणार नाही, असे देवेंद्र फडणवीसांनी ठणकावून सांगितले. मिसिंग लिंकवर दरड कोसळण्याच्या घटनेने आपण काही गोष्टी शिकलो. पाण्याचा प्रवाह कसा बदलू शकतो, दर कशी कोसळू शकते, हे आपल्याला लक्षात आले. त्यामुळे आता आपण आयआयटीमधील तज्ज्ञांचा सल्ला घेऊन नव्या उपाययोजना करणार आहोत. जेणेकरुन कदाचित पुढच्यावर्षी अशी घटना घडणार नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

महायुती सरकारमध्ये हिंमत होती म्हणून आम्ही कनेक्टिंग लिंक बांधून दाखवली. कोकण रेल्वेही तशीच सुरु केली. तेव्हाही ही रेल्वे चालू शकणार नाही, असे म्हटले जायचे.

मात्र, मधू दंडवते नावाच्या माणसाने हिंमत दाखवून कोकण रेल्वे सुरु केली. त्यानंतर सतत १५ वर्षे पावसाळ्यात कोकण रेल्वे मार्गावर दरड कोसळत होती. आपण प्रत्येकवेळी शिकायचो आणि काम करायचो. त्यावेळी घाबरुन कोकण रेल्वे सुरुच केली नसती तर आज काय अवस्था असती? मिसिंग लिंकचा इतिहासही असाच आहे. आघाडी सरकारमध्ये मिसिंग लिंकचा प्रस्ताव तयार झाला.

---

# दिव्यांग शाळांच्या नूतनीकरणासाठी ६० दिवसांची मुदत : मंत्री अतुल सावे यांची विधान परिषदेत माहिती

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – दिव्यांग शाळांच्या ऑनलाईन नूतनीकरणाच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी, पोर्टलवर अर्ज प्राप्त झाल्यानंतर केवळ ६० दिवसांच्या आत नूतनीकरण पूर्ण झालेच पाहिजे, असे कडक निर्देश मंत्री अतुल सावे यांनी आज विधान परिषदेत दिले.

तसेच, या शाळांचे प्रश्न सोडवण्यासाठी सरकार संपूर्णपणे सकारात्मक असून शिक्षकांच्या वेतनासह सर्व प्रलंबित मागण्या प्राधान्याने मार्गी लावल्या जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विधान परिषदेत आज प्रश्नोत्तराच्या तासात आमदार सुधाकर अडबाले यांनी प्रश्न दिव्यांग शाळांच्या नोंदणी प्रक्रियेतील अडचणी आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न उपस्थित केला होता, त्याला उत्तर देताना मंत्री अतुल सावे यांनी सरकारच्या वतीने ही महत्त्वपूर्ण माहिती दिली.

आमदार सुधाकर अडबाले यांनी सभागृहात सांगितले की, २००४ पासून दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या या शाळांच्या दरवर्षीच्या नोंदणी प्रक्रियेत 'महाराष्ट्र दिव्यांग साहाय्यक पोर्टल' आणि ई-फाईल मधील तांत्रिक त्रुटींमुळे संस्थाचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

यामुळे संस्थाचालकांना ऑफलाइन फाईल्स घेऊन कार्यालयात चकरा माराव्या लागतात, ज्यामध्ये ३ ते ४ महिन्यांचा वेळ जातो आणि पर्यायाने कर्मचाऱ्यांचे वेतन रखडते.

यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून दिव्यांग शाळांची नोंदणी दरवर्षी न करता ती 'आजीवन' (कायमस्वरूपी) करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी त्यांनी केली होती. यासोबतच, नागपूर विभागातील कर्मचाऱ्यांना वरिष्ठ आणि निवड श्रेणीचा लाभ अद्याप मिळालेला नसल्याची बाबही त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली होती.

---

# हृदयद्रावक... सेल्फी घेताना मित्र खदानीत पडला, मित्राला वाचवताना दोघेही बुडाले : तिघांचा मृत्यू, गावावर शोककळा

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**जळगाव** – जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडली असून खदानीत सेल्फी काढताना पाय घसरून पडलेल्या तरुणाला वाचवताना आणखी दोघांचा खोल पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. चोपडा रस्त्यावरील उड्डाण पुलाच्या बाजूला असलेल्या खोल पाण्यात बुडून तिघांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना आज सायंकाळी पावणेपाच वाजाताच्या सुमारास घडली. मानव रतनानी (वय १४), कार्तिक उधवानी (वय १४) आणि दिनेश पंजवानी (वय १७) अशी मृतांची नावे आहेत. तिन्ही मुले अमळनेरच्या सिंधी कॉलनीमधील रहिवासी होती. प्राथमिक माहितीनुसार, तिन्ही मुले मंगळवारी सायंकाळी सुमारे ४.४६ वाजता खदाणीत गेली होती. खदाणीत एक बेटासारखा उंचवटा असल्याने तिघे पाण्यातून चालत त्याच्यावर चढले. सेल्फी काढतांना एकाचा पाय घसरला त्याला वाचवायला दुसर्याने त्याचा हात धरला मात्र तोही खाली जाऊ लागला म्हणून त्याने तिसऱ्याचा हात धरला मात्र तिघेही ३० फूट खोल पाण्यात बुडाले. ही घटना एका रिक्षावाल्याच्या नजरेस पडली. तो धावत खाली खदाणीजवळ पोहचला तोपर्यंत एकाने ११२ डायल केले. घटनेची माहिती मिळताच देवळी येथील व स्थानिक नागरिक आणि पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम, नायब तहसीलदार सीयु पाटील, शहर तलाठी अशपाक पिंजारी, पोलीस गणेश पाटील, घटनास्थळी पोहचले. मोठ्या प्रयत्नांनंतर देवळी येथील दीपक मोरे याने पाण्यात उडी मारून तिन्ही मुलांना पाण्यातून बाहेर काढले. मात्र तोपर्यंत तिन्ही मुलांचा मृत्यू झाला होता.

---

# राज्यातील ख्रिश्चन मिशनरींच्या जमिनींची तपासणी होणार

### चंद्रशेखर बावनकुळे यांचं मोठं वक्तव्य

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – राज्यातील ख्रिश्चन मिशनरींच्या जमिनींची तपासणी होणार असल्याची मोठी घोषणा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. येत्या तीन महिन्यात जमाबंदी आयुक्तांकडून ही तपासणी केली जाईल, अशी माहिती बावनकुळे यांनी विधानसभेत दिली आहे. तर धुळे जिल्ह्यात शेतकरी नसताना विकत घेतलेल्या जमिनीची आकडेवारी आम्ही घेत आहोत. कुणीही रजिस्ट्रेशन करायला आल्यावर त्याचा सातबारा राज्यात कुठे आहे? याचा संपूर्ण डेटा देण्याचा ऍक्सेस आपण मुद्रांक अधिकाऱ्यांना दिला आहे. धुळे जिल्ह्यात जर परप्रांतीय लोकांनी जमिनी घेतल्या असतील तर, तिथले विभागीय आयुक्त व इतर अधिकाऱ्यांसोबत एक यंत्रणा तयार करून त्याची चौकशी केली जाईल.

अशी माहितीही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलीय. येत्या तीन महिन्यात जमाबंदी आयुक्तांकडून तपासणी नाशिक मधील ख्रिश्चन मिशनरीच्या नावावर असलेल्या जमिनीचे अभिलेख तपासले जातील. या तपासणी दरम्यान, विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली जमाबंदी आयुक्त कार्यालयातील एक अधिकारी, पोलीस विभागातील अधिकारी आणि आयजीआर मधील अधिकारी यांची समिती या प्रकरणाचा सखोल तपास करेल.

---

# २ दुचाकी भिडल्या : दोघे गंभिर जखमी

### तिवसाघाट ते वरुड रस्त्यावरील माहरुक बनजवळील घटना

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*




**शेंदुरजनाघाट** – तिवसाघाट ते वरुड रस्त्यावरील माहरुक बनाजवळ एक्टिवा व स्प्लेंडर मोटरसायकलमध्ये समोरासमोर झालेल्या धडकेत दोन्ही चालक गंभीर जखमी झाल्याची घटना आज सकाळी ११ वाजताच्या सुमारास घडली. तिवसाघाट ते वरुड रस्त्यावरील महारुक बनाजवळ आज सकाळी ११ वाजताच्या दरम्यान एम.एच. ३१ सी यु ५६२१ व एक्टिवा एम.एस.२७ बी आर ६७६१ या दोन दुचाकीच्या समोरासमोर झालेल्या अपघातामध्ये स्प्लेंडर मोटरसायकल चालक राजेश प्रदीप युवनाते (२२) रा.वरुड हे गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचाराकरिता अमरावती येथे रेफर करण्यात आले असून एक्टिवा चालक सुरेश खंडेलवाल रा.शेंदुरजनाघाट (६७) हे सुद्धा जखमी झाले असून ते वरुड येथे खाजगी रुग्णालयात उपचार घेत असुन या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक राहुल गवई यांच्या मार्गदर्शनाखाली उमेश बुटले करीत आहेत.



# बालविवाह प्रतिबंधक आणि पोक्सो कायदा सर्वांना समान लागू

## मुस्लिम पर्सनल लॉ केंद्रीय कायद्यापेक्षा मोठा नाही

## अलाहाबाद हायकोर्टाचा स्पष्ट निवाळा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***अलाहाबाद*** – देशातील बालविवाह आणि अल्पवयीन मुलींच्या शोषणावर आळा घालण्याच्या दृष्टीने अलाहाबाद उच्च न्यायालयाने एक अत्यंत ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. 'बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६ अंतर्गत विवाहासाठी निश्चित केलेले किमान वय देशातील प्रत्येक नागरिकाला लागू होते, मग तो व्यक्ती कोणत्याही धर्माचा असो. मुस्लिम पर्सनल लॉ अंतर्गत वयात आल्यावर विवाह करण्याची मिळणारी परवानगी ही देशाच्या केंद्रीय कायद्यांपेक्षा मोठी असू शकत नाही,' असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायमूर्ती जे. जे. मुनीर आणि न्यायमूर्ती अचल सचदेव यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि पोक्सो हे वैयक्तिक कायद्यांपेक्षा वरचढ आहेत, यावर न्यायालयाने या निकालाद्वारे शिक्कामोर्तब केले. बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि पोक्सो हे कायदे केवळ गुन्हे रोखण्यासाठी नसून ते सार्वजनिक आरोग्य आणि राष्ट्रीय धोरणावर आधारित आहेत. या कायद्यांमागे एक वैज्ञानिक दृष्टिकोन आहे, ज्याचे रीतसर कायद्यात रूपांतर करण्यात आले आहे.



# पुण्यात बिश्नोई गँगचे खंडणी रॅकेट उद्ध्वस्त

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***पुणे*** – पुणे शहरात व्यावसायिक आणि उद्योजकांना धमकावून खंडणी उकळणाऱ्या कुख्यात बिश्नोई गँगच्या मोठ्या रॅकेटचा पुणे पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत चार संशयित आरोपींना ताब्यात घेतले असून पुढील तपास वेगाने सुरू आहे. पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पत्रकार परिषदेत या संपूर्ण कारवाईची सविस्तर माहिती दिली. ताब्यात घेण्यात आलेल्या चार आरोपींपैकी दोघांना पंजाबमधील भटिंडा येथून ताब्यात घेण्यात आले आहे. हे आरोपी मूळचे सिरसा (हरयाणा) आणि हनुमानगड (राजस्थान) येथील रहिवासी असून ते कामानिमित्त पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात राहत होते. या प्रकरणातील मुख्य संशयित आणि गोळीबार (फायरिंग) करणाऱ्या दोन व्यक्तींची ओळख पटवण्यात आली असून त्यापैकी एका आरोपीला पुणे पोलिसांनी तीन दिवसांपूर्वीच अटक केली आहे. तसेच या गुन्हेगारांना पुण्यात स्थानिक पातळीवर मदत करणाऱ्या एका व्यक्तीलाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गुन्हे शाखेने आतापर्यंत आरोपींकडून ३ अग्निशस्त्रे (फायर आर्म्स) जप्त केली आहेत.



# बसस्थानक ते गावापर्यंतचा मुख्य रस्त्यावर मोठमोठे खडडे

## तातडीने दुरुस्त करण्याची सरपंच अजय चोरोडे यांची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – नांदगाव बसस्थानक ते गावापर्यंतचा मुख्य रस्ता अत्यंत खराब झाला असून नागरिकांना या मार्गावरुन ये-जा करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडल्याने पादचाऱ्यांसह दुचाकी व चारचाकी वाहनचालकांनाही जीव धोक्यात घालुन प्रवास करावा लागत आहे, त्यामुळे या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी नांदगांवचे सरपंच अजय चोरोडे यांनी केली आहे.



यासंदर्भात अजय चोरोडे यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात नमुद केले आहे की, विशेषतः पावसाळ्यात या रस्त्याची दुरवस्था अधिकच गंभीर झाली असून पावसाचे पाणी साचल्याने खड्ड्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे अपघात होण्याची भीती नागरिकांमध्ये व्यक्त केली जात आहे. शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांना या रस्त्यामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर नांदगावचे सरपंच अजय चोरोडे यांनी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने या रस्त्याची दुरुस्ती करून नागरिकांना सुरक्षित व सुकर वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली आहे. वेळेत दुरुस्ती न झाल्यास नागरिकांच्या रोषाला प्रशासनाला सामोरे जावे लागू शकते, असेही त्यांनी सांगितले.

## ध्रीती मॅन्युफॅक्चरिंग मलकापूर येथे

# सी.ए.पदवी प्राप्त केल्याबद्दल सारंग बालपांडेचा गौरव



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***शेंदुरजनाघाट*** – ध्रीती मॅन्युफॅक्चरिंग मलकापूर येथे सारंग बालपांडे यांनी सी.ए.ही मानाची पदवी प्राप्त केल्याबद्दल त्यांचा तसेच त्यांच्या मातोश्री उषा बालपांडे यांचा ध्रीती वेलफेअर ग्रुप, तेली समाज बांधव, मित्र परिवार व प्रतिष्ठित नागरिकांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात संत जगनाडे महाराज व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करुन करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सारंग बालपांडे व उषा बालपांडे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्रशांत भंडारे यांनी केले. यावेळी सारंग बालपांडे यांनी सी.ए.होण्यासाठी केलेला संघर्ष, जिद्द, कठोर परिश्रम व चिकाटी याबद्दल उपस्थितांनी विशेष कौतुक केले. या यशामागील आईचे मोलाचे योगदानही यावेळी गौरविण्यात आले.

यावेळी समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, तेली समाज बांधव, मित्रपरिवार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोरस भांडारवरील कारवाई बेकायदेशीर

## नागपूर खंडपीठाचा निर्णय, तुकाराम मुंढे यांना धक्का

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***वर्धा*** – वर्धा येथील सुप्रसिद्ध गोरस भांडारवरील एफडीएची कारवाई बेकायदेशीर असल्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. एफडीएने निलंबित केलेला परवाना त्वरित बहाल करण्याचे निर्देशही खंडपीठाने दिले आहे. त्यामुळे आयुक्त तुकाराम मुंढे आणि त्यांच्या 'अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कारवाईला मोठा दणका बसला आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाने ३१ मे रोजी गोरस भांडारवर धाड टाकून तेथे अस्वच्छता असल्याचे कारण देत परवाना निलंबित केला होता. एफडीएच्या कारवाईमुळे गोरस भांडारला नऊ लाख रुपयांचे दुग्धजन्य उत्पादन फेकून द्यावे लागले होते. हे नुकसान आता अन्न व औषध प्रशासन विभागाने भरून द्यावे, अशी मागणी गोरस भांडारचे अध्यक्ष निलेश पाटील यांनी केली आहे.




# कोचिंग क्लासेसच्या मनमानीला लागणार चाप

## अवाजवी शुल्कावर लवकरच नवीन कायदा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – राज्यातील खासगी ट्युशन क्लासेस आणि कोचिंग इन्स्टिट्युट्समार्फत खोट्या निकालांची आश्वासने देत आर्थिक लूट, दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींना आळा घालण्यात येणार आहे.

राज्यातील खासगी शिकवणी वर्गांवर कडक नियंत्रण ठेवण्यासाठी खासगी शिकवणी वर्ग (नोंदणी व विनियमन) अधिनियम, २०२६ हा सर्वसमावेशक कायदा तयार करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. येत्या अधिवेशनात हा कायदा मंजुरीसाठी येईल, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विधान परिषदेत दिली. आमदार कृपाल तुमाने आणि डॉ.मनीषा कायंदे आदींनी लक्षवेधी सूचनेद्वारे हा प्रश्न उपस्थित केला. खाजगी क्लासेसकडून अवाजवी शुल्क आणि वाढत्या स्पर्धात्मक दबावामुळे विद्यार्थ्यांवर येणारा मानसिक ताण यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी सदस्यांनी केली होती. मंत्री भुसे यांनी सांगितले की, द प्रोफेशनल टीचर्स असोसिएशनने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिकेच्या अनुषंगाने न्यायालयानेही याबाबत नियमावली करण्याचे सुचवले होते. तसेच केंद्र शासनाने देखील १६ जानेवारी २०२४ रोजी या संदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.



## लोणीच्या श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयातील

# विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव आगळ्यावेगळ्या पद्धतीने

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***वरुड*** – लोणी येथील शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालय येथे दरवर्षीच आगळ्यावेगळ्या पद्धतीने विद्यार्थ्यांचा प्रवेश उत्सव साजरा केला जातो.

कधी बैलबंडीतून तर कधी मोटू पतलू चे वेश परिधान करून ढोल ताशांच्या निनादात विद्यार्थ्यांना गावातून शाळेपर्यंत आणल्या जाते. यावर्षी वैभव दुधे यांच्या सुंदर बग्गी मध्ये बसवून तसेच हिंमत ढोमने यांच्या पांढऱ्या शुभ्र घोड्यावर विद्यार्थ्यांना आरुढ करुन सुधीर खडसे आणि सहकारी यांच्या सुभाष बँड बाजाच्या आवाजात संपूर्ण गावातून फिरून शाळेपर्यंत आणले गेले. गावातून फिरत असताना ग्रामपंचायत कार्यालयापुढे गावचे उपसरपंच रविकांत तिखे, केंद्रप्रमुख आशिष पावडे ग्रा.पं.सदस्य सोनारे, पालक शाम मालपे, सतीश पाटणकर, ग्रामपंचायत कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत केले आणि सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेटचे वाटप केले. गावातून येताना सुद्धा गावातील बऱ्याच नागरिकांनी विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.

विवेक मालपे द्वारा सजावट केलेल्या शाळेच्या प्रवेश द्वारावर संस्थाध्यक्ष शशिकांत कुबडे तसेच पालकांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या उपक्रमाच्या यशस्वितेकरीता सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. शाळेच्या नवनवीन उपक्रमाबद्दल लोणी तसेच परिसरातील नागरिकांमध्ये चर्चा आहे.



## जि.प.प्राथमिक शाळा पांढरघाटी येथे

# शाळा पूर्वतयारी मेळावा क्र.२ चे आयोजन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पांढरघाटी येथे शाळा पूर्वतयारी मेळावा क्रमांक २ चे आयोजन करण्यात येऊन प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. नव्याने शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून, फुलांच्या वर्षावात आणि टाळ्यांच्या गजरात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व महामानवांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेळाव्यात लहान विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, रंगभरण, अक्षर ओळख, संख्या ओळख, कोडी सोडवणे, शब्दखेळ अशा विविध कृती घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. शाळा प्रवेश-ोत्सवाच्या माध्यमातून 'एकही मुलगा शिक्षणापासून वंचित राहू नये' हा संदेश प्रभावीपणे देण्यात आला. गावातील पालकांनीही विद्यार्थ्यांना नियमित शाळेत पाठवण्याचा संकल्प केला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच राहुल फुले तर प्रमुख पाहुणे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जगदीश परतेती, ग्रा.पं.सदस्या फुलाबाई सलामे, माजी ग्रा.पं.सदस्य सुखदेव कोडापे, पोलीस पाटील विजय इडपाची उपस्थित होते.

उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते नावागत बालकांचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना संस्कार देण्याचं काम खऱ्या अर्थाने शाळेत केल्या जाते त्यामुळे शाळा विकासासाठी आपण सर्वांनी हातभार लावणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत राहुल फुले यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता अंगणवाडी सेविका श्रीमती उषा धुर्वे, माला आहाके, बेबी कंगाले, मुकेश उईके, आदित्य आहाके आदींनी अथक परिश्रम केले. संचालन स.शिक्षिका सारिका ठाकरे तर उपस्थितांचे आभार मुख्याध्यापक सुधीर कांबळे यांनी मानले.

# संपादकीय

जशी झाडाला पाण्याची गरज असते,
तशीच मनाला सुविचारांची गरज असते.

## विश्वस्त की मालक?

लोकशाही व्यवस्थेचा गाभा म्हणजे सत्ता ही जनतेकडून मिळालेली जबाबदारी आहे, अधिकाराचा अमर्याद परवाना नव्हे. जनतेने निवडून दिलेले सरकार हे राज्याचे मालक नसून जनतेच्या विश्वासाचे विश्वस्त असते. म्हणूनच सत्तेचा प्रत्येक निर्णय हा लोकहिताच्या कसोटीवर उतरला पाहिजे. मात्र अलीकडच्या काळात अनेक निर्णयांमुळे सरकार जनतेच्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून नव्हे, तर मालक म्हणून वागत असल्याची भावना समाजात निर्माण होत आहे. विशेषतः धार्मिक स्थळे, सार्वजनिक जमिनी आणि नैसर्गिक संसाधनांच्या वापराबाबत घेतले जाणारे निर्णय अनेक प्रश्न उपस्थित करत आहेत. मंदिरे ही केवळ दगड-विटांची वास्तू नसतात. ती लाखो भाविकांच्या श्रद्धेचे, संस्कृतीचे आणि परंपरेचे केंद्र असतात. प्रत्येक मंदिरामागे शतकानुशतके जपलेली लोकभावना, सामाजिक इतिहास आणि अध्यात्मिक मूल्ये दडलेली असतात. त्यामुळे मंदिराकडे केवळ आर्थिक उत्पन्नाचे साधन किंवा रिअल इस्टेटचा प्रकल्प म्हणून पाहणे ही अत्यंत धोकादायक मानसिकता आहे. मंदिर परिसरातील जागा, देणग्या किंवा मालमत्तेचा विकास हा भाविकांच्या श्रद्धेचा आदर राखूनच झाला पाहिजे. अन्यथा विकासाच्या नावाखाली श्रद्धेचे व्यापारीकरण होण्याचा धोका निर्माण होतो. आज अनेक ठिकाणी विकासाच्या नावाखाली धार्मिक स्थळांच्या परिसरात व्यापारी संकुले, पार्किंग प्रकल्प, व्यावसायिक संकुले किंवा इतर आर्थिक उपक्रम उभारण्याचे प्रस्ताव पुढे येतात. विकास आवश्यक आहे; आधुनिक सुविधा आवश्यक आहेत; पण त्या सुविधा श्रद्धेवर मात करणाऱ्या नसाव्यात. मंदिराचा परिसर हा व्यवसायाचे केंद्र बनला, तर त्याचा मूळ आध्यात्मिक उद्देशच हरवण्याची शक्यता असते. धार्मिक स्थळांचा विकास आणि व्यापारीकरण यामधील सीमारेषा पुसली गेली, तर समाजात अविश्वास निर्माण होणे अपरिहार्य ठरेल. धर्माचा खरा अर्थ नैतिकता, संयम, करुणा आणि समाजहित असा आहे. धर्माने माणसाला योग्य-अयोग्याचा विवेक दिला पाहिजे. परंतु जेव्हा धर्माचा वापर राजकारणासाठी, सत्ता टिकवण्यासाठी किंवा आर्थिक लाभासाठी केला जातो, तेव्हा धर्माची प्रतिष्ठाच धोक्यात येते. श्रद्धा ही लोकांच्या अंतःकरणाशी जोडलेली असते. तिचा उपयोग मतपेटी किंवा पैशाची पेटी भरण्यासाठी केला जाऊ लागला, तर समाजात संशय आणि असंतोष वाढतो. भारतीय राज्यघटनेने धर्मस्वातंत्र्याचा अधिकार दिला आहे. याचा अर्थ प्रत्येक व्यक्तीला आपल्या श्रद्धेनुसार उपासना करण्याचे स्वातंत्र्य आहे. सरकारची भूमिका या श्रद्धेचे संरक्षण करण्याची असते; तिचा आर्थिक उपयोग करण्याची नव्हे. सरकारने धार्मिक संस्थांच्या व्यवस्थापनात पारदर्शकता आणणे, गैरव्यवहार रोखणे आणि भाविकांना सुविधा उपलब्ध करून देणे हे निश्चितच आवश्यक आहे. परंतु या नावाखाली धार्मिक संपत्तीवर नियंत्रण मिळवून आर्थिक फायद्याची साधने निर्माण करण्याचा प्रयत्न झाला, तर लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवरच प्रश्नचिन्ह निर्माण होईल. लोकशाहीतील प्रत्येक निर्णय हा सार्वजनिक चर्चेनंतर, संबंधित घटकांशी संवाद साधून आणि लोकभावना लक्षात घेऊन घेतला गेला पाहिजे. मंदिरे, मठ, धार्मिक संस्था किंवा सांस्कृतिक वारसा यांच्याबाबत एकतर्फी निर्णय घेणे योग्य नाही. कारण या संस्था सरकारच्या नव्हे, तर समाजाच्या आहेत. सरकार बदलते; पण श्रद्धा आणि संस्कृती शतकानुशतके टिकून राहतात. त्यामुळे अल्पकालीन आर्थिक लाभासाठी दीर्घकालीन सांस्कृतिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. याचबरोबर सरकारनेही विकास आणि संरक्षण यामध्ये संतुलन राखले पाहिजे. रस्ते, पायाभूत सुविधा, पर्यटन, स्वच्छता आणि सुरक्षा या बाबींचा विकास आवश्यक आहे.

# खाद्यसंस्कृतीचा जागतिक दस्तावेज

**छायाचित्र म्हणजे केवळ दृश्य नोंद नाही; ती एक कथा असते, हे सिद्ध करणारी 'वर्ल्ड फूड फोटोग्राफी अॅवॉर्ड्स २०२६' ही स्पर्धा नुकतीच संपन्न झाली. या स्पर्धेत ५० हून अधिक देशांमधून तब्बल ९ हजार छायाचित्रांची नोंद झाली. त्यातून हेच जाणवले की, प्रत्येक ताटामागे एक कुटुंब, प्रत्येक पिकामागे शेतकऱ्याचा घाम आणि प्रत्येक जेवणामागे संस्कृतीचा वारसा दडलेला असतो.**



मानवाच्या उत्क्रांतीचा इतिहास सांगायचा झाला, तर तो अन्नाशिवाय पूर्ण होऊच शकत नाही. भाकरीच्या शोधापासून ते पंचतारांकित खाद्यसंस्कृतीपर्यंतचा प्रवास हा केवळ चवीचा नसून संस्कृती, परंपरा, श्रम, नाती आणि मानवी अस्तित्वाचा इतिहास आहे. म्हणूनच एखाद्या समाजाची ओळख त्याच्या भाषेत, वेशभूषेत किंवा कलेइतकीच त्याच्या अन्नसंस्कृतीतही दडलेली असते.

याच मानवी अनुभवांचा आणि खाद्यसंस्कृतीचा विलक्षण पट उलगडणारी 'वर्ल्ड फूड फोटोग्राफी अॅवॉर्ड्स २०२६' ही स्पर्धा यंदाही जगभरातील रसिकांचे लक्ष वेधून घेणारी ठरली. सोव्हिएत काळातील ऐतिहासिक आरोग्य केंद्रातील शांत भोजनगृहापासून ते बांगलादेशातील गजबजलेल्या बाजारपेठेपर्यंत, शेतातील कष्टापासून ते घरगुती स्वयंपाकघरातील आत्मीयतेपर्यंत आणि रस्त्यावरील खाद्यसंस्कृतीपासून ते सण-उत्सवांतील सामूहिक जेवणापर्यंतचा स्पर्धेतील प्रत्येक छायाचित्र अन्नाच्या माध्यमातून मानवी जीवनाची वेगळी कहाणी सांगते.

'टेंडरस्टेम् बिमी ब्रोकोलिनी'च्या प्रायोजकत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या २०२६ च्या स्पर्धेत ५० हून अधिक देशांमधून तब्बल ९ हजार छायाचित्रांची नोंद झाली. या छायाचित्रांमध्ये शेतातील पिकांची कापणी, मासेमारी, स्थानिक बाजारपेठा, कौटुंबिक स्वयंपाकघर, स्ट्रीट फूड, पारंपरिक सण-उत्सव आणि उपजीविकेसाठीचा संघर्ष यांचे अस्सल चित्रण करण्यात आले आहे. या स्पर्धेची खरी ताकद तिच्या विषय वैविध्यात आहे. येथे केवळ आकर्षक खाद्यपदार्थांचे छायाचित्रण नाही, तर अन्न माणसाच्या आयुष्याला, संस्कृतीला आणि समाजव्यवस्थेला कशा प्रकारे आकार देते, याचा दृश्यात्मक दस्तऐवज साकारला जातो.

का कॅमेऱ्याच्या क्लिकमधून जगभरातील लोक काय खातात, एवढेच नव्हे तर ते अन्न कुठून येते, कोणाच्या श्रमातून तयार होते आणि त्यांच्या दैनंदिन आयुष्याशी कसे जोडलेले आहे, याचाही प्रभावी वेध या छायाचित्रांमधून घेतला जातो. यंदाचा सर्वोच्च पुरस्कार ब्रिटनच्या छायाचित्रकार जो किर्नी यांच्या "A Woman Eats in the Canteen of the Sovietera Sanatorium" या छायाचित्राला मिळाला. या छायाचित्रात एका वृद्ध महिलेचा साधा जेवणाचा क्षण टिपण्यात आला आहे. कोणताही कृत्रिम देखावा नाही, भव्य मांडणी नाही; तरीही प्रकाश, रंग आणि त्या महिलेच्या शांत, सन्मानपूर्ण उपस्थितीमुळे हे छायाचित्र मानवी प्रतिष्ठेचा आणि साधेपणातील सौंदर्याचा प्रभावी दस्तावेज बनते.

या स्पर्धेतील विजेती आणि अंतिम फेरीतील छायाचित्रे पाहिली, तर अन्न हे केवळ ताटापुरते मर्यादित राहत नाही. कुठे ग्वाटेमालातील रस्त्यावर अननस विकणारा विक्रेता दिसतो, तर कुठे न्यूयॉर्कमधील शहरी शेतीत लेमनग्रासची कापणी करणारे शेतकरी. कोलंबियातील बाजारपेठेतील गजबज, उझबेकिस्तानमधील तंदूरमधून बाहेर आलेल्या गरम भाकरीला स्पर्श करणारे बालपण किंवा घरगुती स्वयंपाकातील साधे क्षण - प्रत्येक छायाचित्र अन्नाच्या माध्यमातून समाज, श्रम आणि संस्कृतीचे वेगळे रूप उलगडते.

'वर्ल्ड फूड फोटोग्राफी अॅवॉर्ड्स'ची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे येथे फक्त सुंदर पदार्थांचे छायाचित्रण महत्त्वाचे नसते. अन्न उत्पादन, शेती, मासेमारी, स्वयंपाक, भोजन, सण-उत्सव, रस्त्यावरील खाद्यसंस्कृती, रेस्टॉरंटमधील जीवन, मोबाइल फोटोग्राफी, नवोदित छायाचित्रकार अशा अनेक विभागांमध्ये पुरस्कार दिले जातात. त्यामुळे ही स्पर्धा खाद्यसंस्कृतीचा व्यापक सामाजिक आणि सांस्कृतिक पट मांडते.

आज सोशल मीडियाच्या युगात अन्नाचे छायाचित्र म्हणजे आकर्षक सादरीकरण, अशी सामान्य धारणा आहे. मात्र या स्पर्धेतील छायाचित्रे त्या चौकटीपलीकडे जातात. ती शेतीतील कष्ट, हवामानाचा परिणाम, अन्नसुरक्षा, परंपरा, कुटुंब, स्थलांतर आणि मानवी जगण्याशी अन्नाचे असलेले नाते अधोरेखित करतात. त्यामुळे ही स्पर्धा केवळ कलात्मक नसून सांस्कृतिक आणि सामाजिक दस्तऐवजीकरणाचे महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरते. म्हणूनच तर इन्फोटोग्राफी म्हणजे क्षण गोठवण्याची कला आहे, जी आयुष्यभर आठवणीत राहते. असे म्हणतात.

या स्पर्धेत जगातील कोणत्याही देशातील व्यावसायिक तसेच हौशी छायाचित्रकार सहभागी होऊ शकतात. भारतासारख्या समृद्ध खाद्यपरंपरा असलेल्या देशासाठी ही स्पर्धा विशेष महत्त्वाची आहे. आपल्या गावातील भाकरी, शेतातील कापणी, मच्छीमारांचे जीवन, आदिवासी खाद्यसंस्कृती, पारंपरिक बाजारपेठा किंवा सणावारातील जेवण यांसारखे विषयही जागतिक पातळीवर तितकेच प्रभावी ठरू शकतात.

# महिला शेतकऱ्यांना न्यायाचा नवा अध्याय

राज्य सरकारने महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून मान्यता देण्याच्या दिशेने उचललेले पाऊल हे ग्रामीण समाजव्यवस्थेत परिवर्तन घडविणारे ठरणार आहे. अनेक वर्षांपासून शेतीच्या प्रत्येक कामात महिलांचा सिंहाचा वाटा असूनही त्यांना 'शेतकऱ्याची पत्नी' किंवा 'शेतमजूर' एवढीच ओळख मिळत होती. प्रत्यक्षात बी पेरण्यापासून ते कापणीपर्यंत, जनावरांची देखभाल, घर-संसार आणि शेतीची जबाबदारी महिलाच सांभाळत असतानाही त्यांच्या श्रमांची अधिकृत दखल घेतली जात नव्हती. राज्य सरकारच्या निर्णयामुळे आता महिला शेतकऱ्यांच्या कष्टांना अधिकृत मान्यता मिळाली असून त्यांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



शेतकरी कुटुंबातील महिला ही शेतीचा अविभाज्य भाग आहे. पुरुषांबरोबर खांद्याला खांदा लावून ती वर्षानुवर्षे शेतीत राबत असते. अनेकदा पुरुष शहरात रोजगारासाठी गेल्यानंतर संपूर्ण शेतीची धुरा महिलाच सांभाळतात. पावसाची अनिश्चितता, वाढते उत्पादन खर्च, बाजारातील चढ-उतार आणि नैसर्गिक संकटे यांचा सामना करत त्या शेती टिकवून ठेवतात. मात्र त्यांच्या नावावर जमीन नसल्यामुळे अनेक सरकारी योजना, कर्ज, विमा किंवा इतर लाभांपासून त्या वंचित राहत होत्या. त्यामुळे त्यांच्या कष्टांना योग्य न्याय मिळत नव्हता.

विदर्भ, मराठवाडा आणि राज्यातील अनेक भागांमध्ये कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण चिंताजनक राहिले आहे. अशा वेळी कुटुंबाचा आधारस्तंभ हरपल्यानंतर संपूर्ण जबाबदारी घरातील महिलांवर येते. संसार सांभाळणे, मुलांचे शिक्षण, वृद्धांची सेवा आणि शेतीची सर्व कामे करत त्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कुटुंब उभे ठेवतात. या महिलांनी संकटांना न घाबरता जिद्दीने शेती सुरू ठेवली, पण त्यांना अधिकृत शेतकरी म्हणून ओळख मिळत नव्हती. सरकारच्या नव्या निर्णयामुळे त्यांच्या योगदानाला शासनाच्या नोंदीत स्थान मिळणार असून हा त्यांच्यासाठी मोठा सन्मान आहे.

महिला शेतकऱ्यांची स्वतंत्र नोंद झाल्यामुळे भविष्यात त्यांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ मिळण्याची शक्यता वाढेल. कृषी प्रशिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान, पीकविमा, अनुदान, बियाणे, सिंचन योजना, कर्जसुविधा तसेच स्वयंरोजगाराच्या संधी अधिक सुलभ होतील. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना मिळेल आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभागही वाढेल. कुटुंबातील आर्थिक व्यवहारांमध्ये त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास या निर्णयाची मदत होईल.

ग्रामीण भागात महिलांच्या सक्षमीकरणासाठी हा निर्णय महत्त्वाचा टप्पा ठरेल. महिला शेतकरी म्हणून अधिकृत ओळख मिळाल्यामुळे समाजातील त्यांचा सन्मान वाढेल. मुलींसाठीही हा प्रेरणादायी संदेश ठरेल की शेती हे केवळ पुरुषांचे क्षेत्र नसून महिलाही सक्षमपणे शेतीचे व्यवस्थापन करू शकतात. यामुळे ग्रामीण समाजातील पारंपरिक मानसिकतेत सकारात्मक बदल होण्यास मदत होईल.

अर्थात, केवळ नोंदणी करून थांबून चालणार नाही. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होणे तितकेच आवश्यक आहे. गावपातळीवर जनजागृती, कागदपत्रांची प्रक्रिया सुलभ करणे, महसूल व कृषी विभागामध्ये समन्वय राखणे आणि पात्र महिलांची नोंदणी वेगाने पूर्ण करणे गरजेचे आहे. तसेच महिलांना त्यांच्या अधिकारांची माहिती देण्यासाठी विशेष अभियान राबविणेही आवश्यक ठरेल.

भारतीय कृषी व्यवस्थेचा कणा असलेल्या महिलांना त्यांच्या श्रमाचा योग्य सन्मान मिळणे ही काळाची गरज होती. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे महिला शेतकऱ्यांचे स्वतंत्र अस्तित्व अधिकृतपणे मान्य झाले असून त्यांच्या स्वाभिमानाला नवी उंची मिळाली आहे.

हा निर्णय केवळ प्रशासकीय बदल नसून सामाजिक न्याय, महिला सक्षमीकरण आणि कृषी विकासाच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. येत्या काळात या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी झाली, तर महिला शेतकऱ्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडेल, त्यांच्या आर्थिक सुरक्षिततेत वाढ होईल आणि शेती क्षेत्र अधिक सक्षम व समृद्ध होण्यास निश्चितच मदत मिळेल.

# सौर ऊर्जेने उजळतोय दक्षिण महाराष्ट्र



जागतिक तापमानवाढ आणि पर्यावरणाच्या ऱ्हासाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण जग आता शाश्वत ऊर्जेकडे वळत आहे. भारतानेही अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा वापर वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, यामध्ये महाराष्ट्र राज्य अग्रगण्य भूमिका बजावत आहे.

महाराष्ट्रात स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेच्या दिशेने मोठी झेप घेतली जात असून सौर ऊर्जेच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागात मोठी ऊर्जा क्रांती घडत आहे. राज्य शासनाच्या मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प, सौर कृषी वाहिनी योजना, तसेच महावितरणच्या विविध उपक्रमांमुळे सांगली, सातारा आणि कोल्हापूर या दक्षिण महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये उल्लेखनीय प्रगती दिसून येत आहे.

राज्यात सौर ऊर्जेची एकूण क्षमता ८,४५० मेगावॅटपर्यंत पोहोचली असून सातारा हा जिल्हा या क्षेत्रात आघाडीवर असल्याचे दिसत. यामुळे केवळ ऊर्जा उत्पादन वाढले नाही, तर पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्वही कमी झाले आहे. या प्रकल्पांच्या अंमलबजावणीत महावितरण या राज्याच्या प्रमुख वितरण कंपनीची महत्त्वाची भूमिका आहे. ही कंपनी राज्यातील हजारो गावांपर्यंत वीज पुरवठा करते. सौर प्रकल्पांना जोडून ऊर्जा वितरण अधिक सक्षम बनवत आहे. सातारा जिल्हा सौरग्राम संकल्पनेत विशेष अग्रेसर आहे. साताऱ्यातील मान्याचीवाडी हे राज्यातील पहिले 'सौरग्राम' ठरले आहे. येथे संपूर्ण गावाची विजेची गरज सौर ऊर्जेद्वारे पूर्ण केली जाते. या संकल्पनेमुळे ग्रामीण भागात २४ तास वीजपुरवठा शक्य झाला असून शाळा, अंगणवाडी, शेती सिंचन आणि घरगुती वापरासाठी हक्काची वीज उपलब्ध झाली आहे. सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांमध्येही सौर कृषी वाहिनी योजना आणि रूफटॉप सोलर प्रकल्पांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर काम सुरू आहे.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)मार्फत शेतकऱ्यांना सौर पंप आणि सिंचनासाठी सौर प्रणाली उपलब्ध करून दिली जात आहे. सौर पंपांमुळे शेतकऱ्यांचा वीज खर्च शून्यावर आला असून, विजेसाठी पावसावर किंवा रात्रीच्या वीज पुरवठ्यावर अवलंबून राहण्याची गरज उरलेली नाही. सौर ऊर्जेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे कार्बन उत्सर्जनात होणारी घट आणि पर्यावरण संरक्षण. ग्रामीण भागातील वीज खंडित होण्याचे प्रकार कमी होऊन सातत्यपूर्ण पुरवठा मिळत आहे. तसेच, 'प्रधानमंत्री सूर्यघर योजना' आणि राज्य शासनाच्या अनुदानामुळे घरांवर सौर पॅनल बसवणे सर्वसामान्यांना परवडणारे झाले आहे. ३ किलोवॅटपर्यंतच्या सोलर प्रणालीवर ४०% पर्यंत अनुदान मिळत असल्याने मध्यमवर्गीय कुटुंबांना याचा मोठा आर्थिक लाभ होत आहे.

दक्षिण महाराष्ट्रातील या जिल्ह्यांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे स्थानिक रोजगारनिर्मितीलाही चालना मिळाली आहे. सोलर पॅनेल बसवणे, देखभाल आणि तांत्रिक सेवा या क्षेत्रात नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. उद्योग आणि शेती क्षेत्राला स्वस्त वीज उपलब्ध झाल्याने त्यांची उत्पादनक्षमता वाढली आहे. एकूणच, मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प आणि संबंधित योजनांमुळे दक्षिण महाराष्ट्रात सकारात्मक परिवर्तन होत आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# बीपीसीएल, विमा कंपनीने भरपाई द्यावी!

## आगीबाबत न्यायालयाने दिले निर्देश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – एलपीजी सिलिंडर गळतीमुळे लागलेल्या आगीत एका महिलेचा मृत्यू झाल्याच्या घटनेला ११ वर्षांहून अधिक काळ उलटल्यानंतर, ग्राहक न्यायालयाने एक मोठा निर्णय दिला आहे. न्यायालयाने भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड आणि युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीला बेजबाबदारपणा आणि सेवेतील त्रुटींबद्दल मृत महिलेच्या कुटुंबीयांना संयुक्तपणे ७.६० लाख रुपयांपेक्षा जास्त भरपाई देण्याचे निर्देश दिले आहेत. नागपूर येथील अतिरिक्त जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाने २ जुलै रोजी हा आदेश जारी केला. ही तक्रार घटनेच्या सुमारे चार वर्षांनंतर दाखल करण्यात आल्याचा 'बीपीसीएल'चा युक्तिवाद आयोगाने फेटाळून लावला आहे. तसेच, विमा कंपनीने कागदपत्रांच्या कमतरतेचे कारण पुढे करून क्लेम (दावा) सक्रियपणे निकाली काढण्याऐवजी तो बंद केल्याबद्दल आयोगाने तीव्र नाराजी व्यक्त केली.

# तुमच्या आश्वासनांची श्वेतपत्रिका मांडा!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## विधानसभा अध्यक्षांचे राज्य सरकारला निर्देश



**मुंबई** – राज्य सरकारने विधानसभेत दिलेली आश्वासने आणि अधिक माहिती पटलावर ठेवण्याचा दिलेला शब्द याचा आता लेखाजोखा मांडला जाणार आहे. सरकारच्यावतीने देण्यात आलेल्या आश्वासनांबाबत चालू पावसाळी अधिवेशनाचे कामकाज संपण्यापूर्वी सभागृहात श्वेतपत्रिका सादर करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मंगळवारी राज्य सरकारला दिले. त्यावर पुढील चार दिवसांत कार्यवाही करण्याचे आश्वासन संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.

विधानसभेत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न करणे किंवा विलंबाने करण्याबाबतचा मुद्दा मंगळवारी विधानसभेत पुन्हा चर्चेला आला. १७ डिसेंबर २०१५ रोजीच्या तारांकित प्रश्नावरील पूरक माहिती सोमवारच्या कामकाजावेळी सादर करण्यात आली. त्यावर, भाजपच्या सुधीर मुनगंटीवार यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. यापूर्वीही सभागृहात विलंबाने होणाऱ्या आश्वासनपूर्तीचा मुद्दा आला होता. तेव्हा तर स्वतः मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपण आमदार असताना मांडलेल्या कपात सूचनेचे उत्तर मुख्यमंत्री असताना मिळाल्याची आठवण सांगितली होती.

अलीकडेच मी २०२२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिलेल्या कपात सूचनेचे उत्तर मागच्या आठवड्यात आल्याचे सांगून विधानसभेला इतके कमी समजू नका, असा इशारा मुनगंटीवार यांनी दिला. राज्य सरकारने दिलेली आश्वासने आणि इतर प्रलंबित बाबींची माहिती याबाबतची श्वेतपत्रका हे अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहात मांडावी, असे निर्देश त्यांनी सरकारला दिले.

# साताऱ्यात एकाच कुटुंबातील चौघांचा विजेचा धक्का लागून अंत

## एकमेकांना वाचवण्याच्या नादात सगळेच चिकटले

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**सातारा** – एकमेकांना वाचवण्याच्या नादात कुटुंबातील इतर सदस्य पुढे सरसावले, पण काळानं त्यांच्यावरही घाला घातला.

जिल्ह्यात अत्यंत धक्कादायक आणि मन सुन्न करणारी घटना घडली आहे. फलटण तालुक्यातील खामगाव येथे विजेचा तीव्र धक्का लागून एकाच कुटुंबातील चार जणांचा जागीच मृत्यू झाला. हे सर्व मृत व्यक्ती पारधी समाजातील एकाच कुटुंबातील असून, या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण सातारा जिल्ह्यात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. घरासमोरील विद्युत केबलच्या उघड्या तारेला एकाचा स्पर्श झाला. एकमेकांना वाचवण्याच्या नादात कुटुंबातील इतर सदस्य पुढे सरसावले, पण काळानं त्यांच्यावरही घाला घातला. एकमेकांना वाचवण्याच्या प्रयत्नात या चारही जणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. मृतांची नावे किसोरडे शिंदे, सचिन शिंदे, गगाया शिंदे आणि अर्चना शिंदे अशी आहेत.

घटनेची माहिती मिळताच फलटण पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे. महावितरणच्या कारभारावर आणि सुरक्षेवर आता स्थानिक पातळीवरून मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

# वारीसाठी पुणे पोलिसांची 'हायटेक' सुरक्षा व्यवस्था

## एआय, ड्रोन, चेहरा ओळखणारी यंत्रणा, जीपीएस, सीसीटीव्हीसह ८ हजारांहून अधिक पोलिसांचा फौजफाटा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – आषाढी वारी म्हटली की लाखो वारकरी, भक्तिभावाचा महासागर आणि त्याचबरोबर सुरक्षेचे मोठे आव्हान. मात्र, यंदा पुणे पोलिसांनी या आव्हानावर अत्याधुनिक तंत्रज्ञानाची भक्कम ढाल उभी केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ड्रोन, चेहरा ओळखणारी यंत्रणा, जीपीएस ट्रॅकिंग, अत्याधुनिक सीसीटीव्ही नेटवर्क आणि आठ हजारांहून अधिक पोलिसांच्या तगड्या फौजफाट्याच्या बळावर यंदाची वारी सुरक्षा व्यवस्थेत पार पडणार आहे. संशयित व्यक्ती कॅमेऱ्यात दिसताच नियंत्रण कक्षाला तत्काळ इशारा, गर्दी धोक्याच्या पातळीवर पोहोचताच एआय प्रणालीकडून स्वयंचलित अलर्ट आणि हवेतून ड्रोनची करडी नजर अशी चौफेर सुरक्षा व्यवस्था उभारण्यात आल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. ९ ते १२ जुलैदरम्यान संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या पुणे शहरात मुक्कामी असतील. यंदा प्रथमच पालखी मार्गावर एकूण २४४ कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित कॅमेरे कार्यरत राहणार आहेत. त्यापैकी संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर १२५, तर संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर १०१ कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

## नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रं.३ मधील विद्यार्थ्यांना

# नगरसेविका स्नेहल वघाळे यांचे शालोपयोगी साहित्य वाटप

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – सामाजिक बांधिलकी जोपासत आपल्याला समाजाचे काही देणं या उदार विचाराने प्रेरित होत शेंदुरजनाघाट नगरपरिषदेच्या प्रभाग क्र. ४ च्या नगरसेविका स्नेहल आकाश वघाळे यांनी नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रं.३ शेंदुरजनाघाट येथे गरजु व गरीब विद्यार्थ्यांना शालेय दप्तरासह खाऊचे वाटप केले.

त्यांच्या या मनोभावे सेवेने विद्यार्थ्यांमध्ये आनंद व उत्साह निर्माण झाला आहे. यांच्या या सेवाभाव व सामाजिक वृत्तीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या कार्यक्रमाकरिता नगरसेविका स्नेहल वाघाळे, आकाश वघाळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष देवेंद्र राठोड, न.प.शाळा क्रं.३ चे प्र.मुख्याध्यापक गौरव बोरे, शिक्षिका नेहा सूपले, कंत्राटी शिक्षिका प्रणाली सुपले, कर्मचारी मनीषा राजगुरे, अर्चना सावरकर, पुरुषोतम भद्रे इत्यादी मान्यवरासह विद्यार्थी उपस्थित होते.

## डॉ.मिना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथे

# पहिली पालक-शिक्षक सभा उत्साहात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – स्थानिक नवयुवक शिक्षण संस्था अंतर्गत डॉ.मिना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथे शैक्षणिक सत्र २०२६-२७ मधील पहिली पालक – शिक्षक सभा नुकतीच संपन्न झाली. या सभेला पालकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

या सभेमध्ये नवीन शैक्षणिक क्षेत्रात होणाऱ्या उपक्रमांची माहिती देण्यात आली तसेच पालकांनी शैक्षणिक प्रगतीसह विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शालेय उपक्रमांना सकारात्मक प्रतिसाद दिला.

सभेच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका नीता चिमोटे यांनी उत्कृष्ट असे मार्गदर्शन केले.यामध्ये संपूर्ण शैक्षणिक सत्राचा आढावा घेण्यात आला. या सभेमध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, शिस्त, स्पर्धा परीक्षा, विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती, सहशालेय उपक्रम, डिजिटल शिक्षण, अभ्यासातील सातत्य, पालकांची जबाबदारी या विषयावर सविस्तर सुसंवाद साधला गेला. यामध्ये पालकांनी शाळेच्या नियोजनामध्ये योग्य तो सहभागी दर्शवण्याची ग्वाही देत पालक सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सभेचे संचालन शिक्षक प्रशांत आंडे यांनी केले. विपुल पाचघरे, अतुल टोंगसे, लीना पवार यांच्या उपस्थितीत ही सभा संपन्न झाली.

# कोकण ते पालघर जलमय : पावसाने जनजीवन विस्कळीत, प्रशासन युद्धपातळीवर कार्यरत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाने कोकणसह पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि ठाणे जिल्ह्यांना अक्षरशः झोडपून काढले असून अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. नद्या-नाले दुथडी भरून वाहत आहेत, दरडी कोसळण्याच्या घटना घडत आहेत, तर वीजपुरवठा खंडित होणे, दूषित पाणीपुरवठा, रस्ते व पूल पाण्याखाली जाणे आणि वाहतुकीवर निर्बंध यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक भागांमध्ये शेकडो नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले असून बचाव, मदत आणि पुनर्वसनाची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. एनडीआरएफ, एसडीआरएफ, महावितरण आणि जिल्हा प्रशासन सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक उपाययोजना करत आहेत. अभूतपूर्व जलसंकट पालघर : सलग कोसळणाऱ्या मुसळधार पावसाने पालघर जिल्ह्यावर अभूतपूर्व जलसंकट ओढवले असून जिल्ह्यातील परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे. अतिवृष्टीमुळे आतापर्यंत १० जणांचा मृत्यू झाला असून ४०१ कुटुंबांतील १,३०७ नागरिकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आले आहे. अनेक गावे आणि पाड्यांचा संपर्क तुटला असून हजारो नागरिकांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

## अमरावती येथे शेतकऱ्यांसाठी कृषी उत्पादनांचे

# किंमत जोखीम व्यवस्थापन या विषयावर प्रशिक्षण सत्र

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**अमरावती** – बाळासाहेब ठाकरे कृषी आणि ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प आणि एन.सी.डी.ई.एक्स इन्स्टिट्यूट ऑफ कमॉडिटी मार्केट्स अँड रिसर्च (एन.आय.सी.आर) अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या 'हेजिंग डेस्क'च्या माध्यमातून अमरावती येथील आर.ए.एम.ई.टी.आय येथे 'वायदे बाजाराद्वारे किंमत जोखीम व्यवस्थापन' या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षण सत्रात शेतकऱ्यांना कमॉडिटी बाजाराचे महत्त्व, फ्युचर्स आणि ऑप्शन्स व्यवहारांचे स्वरुप तसेच हेजिंगच्या माध्यमातुन किंमत जोखीम कशी कमी करता येते? या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

हे सत्र स्मार्ट अमरावती डी.आय.यु.नोडल अधिकारी विवेक टेकाडे, आर.आय.यु.चे आर.आर.पठाण यांच्या उपस्थितीत पार पडले. या प्रशिक्षणात एकूण ५३ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. आजपर्यंत हेजिंग डेस्कने महाराष्ट्रभर ३९ प्रशिक्षण सत्रांद्वारे शेतकरी व शेतकरी उत्पादक संस्थांना किंमत जोखीम व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन केले व शेतकरी उत्पादक संस्थांना प्रत्यक्ष वायदे बाजारात काम करण्यासाठी योग्य ती मदत करत आहेत. याप्रसंगी हेजिंग डेस्कचे प्रतिनिधी गौतम आठवले प्रामुख्याने उपस्थित होते.

## बँक ऑफ महाराष्ट्रचा स्तुत्य उपक्रम : महिलांना रोजगाराची नवी संधी

# ३५ महिलांचा 'कॉस्च्युम ज्वेलरी' प्रशिक्षण उपक्रम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**हिवरखेड** – ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी आणि त्यांच्यातील उद्योजकता कौशल्याला वाव देण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेच्या अमरावती वतीने हिवरखेड येथे आयोजित करण्यात आलेले १४ दिवसांचे 'कॉस्च्युम ज्वेलरी' प्रशिक्षण नुकतेच यशस्वीरित्या संपन्न झाले.

या प्रशिक्षणामध्ये परिसरातील एकूण ३५ बचत गटाच्या महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. यावेळी आधुनिक दागिने बनविण्याचे मोफत प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणा दरम्यान महिलांना विविध प्रकारचे फॅशनेबल दागिने, गळ्यातील हार, कानातले, बांगड्या आणि सणासुदीला लागणारे विविध डिझायनर दागिने अत्यंत कुशलतेने कसे बनवायचे, याचे सविस्तर प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात आले.

दागिने बनवण्याच्या कौशल्यासोबतच महिलांना आपला स्वतःचा व्यवसाय कसा सुरु करावा? उत्पादनाची गुणवत्ता कशी राखावी? तसेच बाजारात (मार्केटिंग) मालाची विक्री कशी करावी? याचेही मार्गदर्शन तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून करण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या सर्व महिलांना शासकीय प्रमाणपत्र देण्यात येणार असून, त्यांना स्वतःचा गृहउद्योग सुरू करण्यासाठी आरसेटी आणि बँकेमार्फत कर्ज जोडणी व पुढील दोन वर्षे आवश्यक ते सहकार्य केले जाणार आहे.

या उपक्रमाबद्दल हिवरखेड परिसरातील नागरिकांकडून 'बँक ऑफ महाराष्ट्र आरसेटी'चे विशेष कौतुक होत आहे.

# तर धर्मादाय रुग्णालयांवर होणार कारवाई : रुग्णालयांना 'डॅशबोर्ड' लावणे बंधनकारक, जिल्हा पातळीवर विशेष तपासणी मोहीम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – धर्मादाय रुग्णालयांनी गोरगरीब रुग्णांसाठी १५ टक्के खाटा राखीव ठेवणे बंधनकारक आहे. त्यानंतरही रुग्णालये नियमाचे उल्लंघन करत असल्याचा मुद्दा आज विधान परिषदेत गाजला. यावर उत्तर देताना मंत्री शंभूराज देसाई यांनी 'नियम न पाळणाऱ्या धर्मदाय रुग्णालयांवर कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिले. या रुग्णालयांची तपासणी करण्यासाठी जिल्हा पातळीवर विशेष मोहीम राबवून त्यांना खाटांच्या उपलब्धतेबाबत 'डॅशबोर्ड' लावणे बंधनकारक केले जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले. आमदार अनिल परब यांनी परळ येथील 'ग्लोबल हॉस्पिटल'कडून नियमांचे पालन होत नसल्याचा प्रश्न उपस्थित केला. या चर्चेत नीलम गोऱ्हे, भाई जगताप, मनीषा कायंदे, चित्रा वाघ, निरंजन डावखरे यांसह अनेक सदस्यांनी लक्ष वेधले. मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले की, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात चॅरिटी रुग्णालयांवर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हास्तरीय समित्या कार्यरत आहेत. अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून तपासणी मोहीम राबविण्याच्या सूचना दिल्या जातील. ज्या रुग्णालयांमध्ये त्रुटी आढळतील, त्यांच्यावर कठोर कारवाई होईल.

ग्लोबल हॉस्पिटलवर उत्तर देताना राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या की, या रुग्णालयाची नर्सिंग नोंदणी आणि ऑक्युपन्सी सर्टिफिकेट रद्द करण्याची नोटीस प्रशासनाने दिली होती. मात्र, हे प्रकरण न्यायप्रविष्ट असून न्यायालयाने या कारवाईला स्थगिती दिली आहे.

# खरीप हंगाम पीक विमा योजनेला सुरुवात : ३१ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

*अमरावती* – प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत खरीप हंगाम सन २०२६-२७ करीता शेतकरी सहभागा सुरुवात झाली आहे. या हंगामासाठी जिल्ह्याकरिता 'इफ्को टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी'ची निवड करण्यात आली आहे. नैसर्गिक आपत्ती, कीड व रोगासारख्या प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना हक्काचे विमा संरक्षण देणे, हा या योजनेचा हेतू आहे. पिकांच्या नुकसानीच्या कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राहा-वे, तसेच त्यांना नावीन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामुग्री वापरण्यास प्रोत्साहन मिळावे, यासाठी ही योजना फायदेशीर ठरणार आहे.



या योजने अंतर्गत खरीप हंगामातील विविध प्रमुख पिकांच्या उत्पादनात येणाऱ्या घटीपासून शेतकऱ्यांना विमा संरक्षण आणि नुकसान भरपाई मिळणार आहे. चालू हंगामासाठी पीक विमा उतरवण्याचा अंतिम दिनांक ३१ जुलै २०२६ आहे. कृषी विभागाकडून जिल्ह्यातील सर्व शेतकरी बंधूंना आवाहन करण्यात आले आहे की, त्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता ३१ जुलै २०२६ पूर्वी आपल्या पिकांचा विमा काढून या योजनेचा लाभ घ्यावा. योजनेबाबत सविस्तर माहितीसाठी शेतकरी आपल्या गावातील सहाय्यक कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका स्तरावर तालुका कृषी कार्यालयाशी थेट संपर्क साधावा.

या योजनेत मृत शेतकऱ्यांच्या नावे तसेच इतर अवैध मार्गाने पीक विमा काढल्याचे निर्दर्शनास आल्यास संबंधित अर्ज त्वरित रद्द केला जाईल. योजनेमध्ये सहभागासाठी शेतकऱ्यांकडे 'ॲग्रीस्टॅक शेतकरी ओळखपत्र क्रमांक' असणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच पीक विमा नुकसान भरपाई मिळवण्यासाठी 'ई-पीक पाहणी' अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक राहील. पीक विम्याचा अर्ज करताना शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक, ७/१२, ८अ, आधार कार्ड, बँक पासबुक आणि स्वयंघोषणा पत्र ही आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवणे गरजेचे आहे.

या योजनेतंर्गत विविध पिकांसाठी विमा संरक्षित रक्कम आणि प्रति हेक्टर शेतकरी हिस्सा (विमा हप्ता) निश्चित करण्यात आला आहे. यामध्ये भात (तांदूळ) पिकासाठी ६५ हजार रुपये संरक्षित रकमेवर ६५० रुपये हप्ता, खरीप ज्वारीसाठी ३३ हजार रुपये संरक्षित रकमेवर ६६० रुपये हप्ता, तर सोयाबीनसाठी ६२ हजार ५०० रुपये संरक्षित रकमेवर १ हजार २५० रुपये हप्ता ठरवण्यात आला आहे. याशिवाय मूग पिकासाठी २९ हजार ७०० रुपये रकमेवर ५९४ रुपये हप्ता, तूर पिकासाठी ४७ हजार रुपये रकमेवर ९४० रुपये हप्ता,कापूस पिकासाठी ६५ हजार रुपये रकमेवर ९७५ रुपये हप्ता, मक्यासाठी ४० हजार रुपये रकमेवर ८०० रुपये हप्ता आकारला जाईल.

सी.एस.सी. केंद्रांमार्फत अर्ज करताना शेतकऱ्यांनी पीकनिहाय निश्चित केलेल्या शेतकरी हिश्श्याच्या रकमेपेक्षा अधिक पैसे देऊ नयेत. जर कोणत्याही केंद्रावर अतिरिक्त पैशांची मागणी केली गेल्यास शेतकऱ्यांनी कृषी विभाग किंवा तहसील कार्यालयाकडे तात्काळ तक्रार करावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# नागरिकांना सेवा विहित कालावधीत द्याव्यात : राज्य सेवा हक्क आयुक्त अरूण डोंगरे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

*अमरावती* – नागरिकांना शासनाच्या सेवा विहित कालावधीत मिळाव्यात यासाठी सेवा हमी हक्क कायदा राज्यात लागू झालेला आहे. शासनच्या बहुतांश सेवा ऑनलाईन आणि या कायद्यामध्ये आणण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे या सेवा विहित कालावधीत देण्यात याव्यात, असे निर्देश राज्य सेवा हक्क आयुक्त अरूण डोंगरे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात सेवा हमी हक्क कायद्यातील अधिसूचित सेवांचा आढावा आज घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी आशिष येरेकर, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे आदी उपस्थित होते.



डोंगरे यांनी विभागनिहाय प्रत्येक सेवांचा यांनी अधिनस्त कार्यालयांकडे प्रलंबित असलेल्या अर्जांचा आढावा घेतला. सध्या शाळा सुरू झालेल्या असल्यामुळे शैक्षणिक कागदपत्रांमध्ये जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला आदी कागदपत्रांसाठी मोठ्या प्रमाणावर अर्ज सादर केले जातात. त्यामुळे हे सर्व अर्ज डॅशबोर्डवर नोंदविण्यात यावेत. तसेच दिलेल्या कालावधीत अर्ज निकाली काढावेत. या डॅशबोर्डवर प्रत्येक अर्जाची नोंद होत असून निकाली काढण्याचा कालावधी दिसून येत असल्याने कार्यालय प्रमुखांनी यावर लक्ष ठेवावे. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांनी अधिनस्त कार्यालयांकडे प्रलंबित असलेल्या अर्जांचा आढावा घ्यावा. जिल्हा परिषदेत विभागाची स्वतंत्र ऑनलाईन अर्जाची यंत्रणा आहे. तरीही सेवा हमी हक्कच्या माध्यमातून आलेल्या अर्जावर तातडीने कार्यवाही करावी. याची नोंद पोर्टलवर करण्यात यावी. सेवा हक्क हमी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत दर तीन महिन्यांनी आढावा घेण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्हा आणि कार्यालय पातळीवर सेवांच्या कालवधीची अंतिम मुदत लक्षा घेऊन अर्ज निकाली काढण्यात यावेत, अशा सूचनाही डोंगरे यांनी दिल्या.

# शिंदे गटाच्या नगरसेवकाची डॉक्टर नर्सना बेदम मारहाण, राऊत : फडणवीस गृहखात्याची पूजा घाला; मिंधे गँगच्या गुंडाना अटक करणार की नाही? आदित्य ठाकरेंचाही मुख्यमंत्र्यांवर हल्लाबोल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – कल्याण डोंबिवली महापालिकेच्या रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिकांना बेदम मारहाण शिवसेना शिंदे गटाच्या नगरसेवकाकडून करण्यात आल्यानंतर आरोग्य संघटनांमध्ये एकच आक्रोश पसरला आहे. शिवसेना शिंदे गटाचे ज्येष्ठ नगरसेवक रमेश म्हात्रे यांनी कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या शास्त्री नगर हॉस्पिटलमध्ये डॉक्टर आणि नर्सेसना सुद्धा बेदम मारहाण केली. या मारहाणीचे तीव्र पडसाद उमटले असून म्हात्रे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करा या मागणीसाठी महानगरपालिकेतील आरोग्य कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन केलं. तसेच तातडीने कारवाई करण्याची मागणी करत संपावर जाण्याचा सुद्धा इशारा इंडियन मेडिकल असोसिएशनकडून देण्यात आला आहे. आपल्याकडील गृहमंत्री पदाची पूजा घाला! दरम्यान, या सर्व प्रकारानंतर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून प्रहार केला आहे. संजय राऊत यांनी ट्वीट करत म्हटलं आहे की, सन्मानीय मुख्यमंत्री फडणवीसजी आपल्याकडील गृहमंत्री पदाची पूजा घाला! ज्या पांढऱ्या कपड्यातील देवदूतांनी कोरोना काळात जनतेची सेवा केली, त्या महिला डॉक्टर आणि नर्सना मिंधे टोळीचे गुंड इस्पितळात घुसून अमानुष मारहाण करतात.


## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

क्र.प्रस्तु-१/कावी-३१७/२६ दि.२९/०६/२०२६

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **शाहीन परवीन अब्दुल शहिद, रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे- शाहीन परवीन अब्दुल शहिद, रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.१७/०४/१९९०** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदर्हू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **२९/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

क्र.प्रस्तु-१/कावी-३१८/२५-२६ दि.२९/०६/२०२६

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **रुबीना परवीन अब्दुल शहिद, रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे- रुबीना परवीन अब्दुल शहिद, रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.०१/०१/१९८४** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदर्हू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **२९/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील एम.डी.सैनदाने, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५७१/२०२६ ने.ता.१९/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) बाळकृष्ण चिंधुजी थोटे, वय अं.८१ वर्ष, धंदा-आराम, २) आशाबाई जनार्दनराव लांडे, वय अं.७३ वर्ष, धंदा-घरकाम, ३) उषाबाई मरोतराव अलोणे, वय अं.५६ वर्ष, धंदा-घरकाम, ४) निर्मला मुरलीधर बांडे, वय अं.५५ वर्ष, धंदा-घरकाम, ५) शुभांगी श्रीकृष्ण इसळ, वय अं.४३ वर्ष, धंदा-घरकाम, ६) अक्षय रमेशराव जुवारे, वय अं.२६ वर्ष, धंदा-शेती, ७) वैष्णवी रमेशराव जुवारे, वय अं.२५ वर्ष, धंदा-घरकाम, अर्जदार क्र.१, ६, ७ रा.जरुड, ता.वरुड, अर्जदार क्र.२ रा.आष्टगाव, ता.मोर्शी, अर्जदार क्र.३ रा.गाडेगाव, ता.वरुड, अर्जदार क्र.४ रा.नरखेड, अर्जदार क्र.५ रा.दारापुर, ता.दर्यापुर

**... विरुध्द ... कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत लिलाबाई बाळकृष्ण थोटे, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.१९/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०३/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५७२/२०२६ ने.ता.०६/०८/२०२६**

**अर्जदार :-**

नामदेवराव संपतराव बरडे
वय अं.८३ वर्ष, धंदा-आराम
रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत संपतराव व्यंकटराव बरडे व मयत अन्नपुणाबाई संपतराव बरडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०६/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०२/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### सर्पमित्र दिपक खंडेलवाल यांनी विद्यार्थ्यांना दिले सर्प शिक्षणाचे धडे

# वरुडच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ७ फुटी धामणचे रेस्क्यु

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – शहरातील न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूलमध्ये शाळा भरलेली असतांना अचानक एक भलामोठा साप आढळून आल्याने एकच खळबळ उडाल्याने विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

मात्र, शिक्षकांच्या सतर्कतेमुळे आणि सर्पमित्राच्या तत्परतेमुळे ७ फूट लांबीच्या धामण प्रजातीच्या सापाचे यशस्वी रेस्क्यु करण्यात आले. सापाला पकडल्यानंतर सर्पमित्र दिपक खंडेलवाल यांनी विद्यार्थ्यांना सापांविषयी सविस्तर माहिती देऊन त्यांचे प्रबोधन केले, ज्यामुळे भीतीचे सावट ओसरुन सर्वांनी सुटकेचा श्वास घेतला.



दुपारचे सुमारास नेहमीप्रमाणे शाळा सुरू असताना एका विद्यार्थ्याचे लक्ष शाळेच्या खिडकीतून वर्गखोली बाहेर असलेल्या एका मोठ्या सापाकडे गेले. साधारण ७ फूट लांबीचा तो अजस्त्र साप पाहताच विद्यार्थ्यांची घाबरगुंडी उडाली. शिक्षकांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून अजिबात वेळ न घालवता सर्पमित्र दीपक खंडेलवाल यांच्याशी संपर्क साधला. माहिती मिळताच सर्पमित्र दीपक खंडेलवाल यांनी तातडीने शाळेत धाव घेतली आणि अत्यंत शिताफीने व सुरक्षितपणे त्या ७ फुटी सापाचे रेस्क्यु करीत तो साप धामण प्रजातीचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सापाला पकडुन बरणीमध्ये बंद केल्यानंतर सर्पमित्र दीपक खंडेलवाल यांनी उपस्थित विद्यार्थी आणि शिक्षकांना सापांबद्दल मोलाची माहिती दिली. ग्रामीण किंवा निमशहरी भागात बाहेर बूट किंवा चपला ठेवल्या असल्यास त्या घालण्यापूर्वी आत काही आहे का? हे आवर्जून तपासावे. रात्री जमिनीवर झोपणे टाळावे किंवा मच्छरदाणीचा वापर करावा. शाळेच्या आवारात घडलेल्या या घटनेमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष लाईव्ह सर्प शिक्षणाचा अनुभव मिळाला. भितीचे रूपांतर ज्ञानात झाल्याने शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी सर्पमित्र दिपक खंडेलवाल यांचे आभार मानले.

रेस्क्यु केलेल्या धामणला नंतर सुरक्षितपणे नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले.

**सर्पदंश झाल्यास काय करावे?**

"दुर्दैवाने सर्पदंश झाल्यास कोणत्याही मांत्रिक, बाबा किंवा जडीबुटीच्या नादी न लागता रुग्णाला धीर द्यावा आणि तातडीने त्यांना शासकीय रुग्णालयात नेऊन अँटी स्नेक व्हेनमचे इंजेक्शन द्यावे. हाच एकमेव खात्रीशीर उपाय असल्याचे सर्ममित्र दिपक खंडेलवाल यांनी सांगितले.

# आता 'डोमिसाईल' सक्तीचे!

# वाहन परवान्यांसाठी नवा नियम

### १ ऑगस्टपासून अंमलबजावणी, प्रस्ताव न्याय विभागाकडे

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – राज्यात वाहनचालक परवाना मिळिवण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ पासून नवीन नियमावली लागू करण्यात येणार असून त्यानुसार महाराष्ट्र अधिवास (डोमिसाईल) प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. ड्रायव्हिंग परवाना नवीन नियमावलीचा प्रस्ताव विधी आणि न्याय विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला असून मंजुरीनंतर त्याची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. या संदर्भातील नवीन ड्रायव्हिंग लायसन्स नियमांचा प्रस्ताव मंजुरीसाठी विधी व न्याय विभागाकडे पाठवण्यात आला असून, आवश्यक ती मंजुरी मिळाल्यानंतर त्याची तत्काळ अंमलबजावणी केली जाईल, असे त्यांनी सांगितले. विधानसभा सदस्य दिलीप लांडे यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्र्यांनी ही माहिती दिली.




बाईक टॅक्सींवर कारवाई राज्यातील अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांवर कडक कारवाई केली जात असल्याचे सांगत परिवहन मंत्र्यांनी स्पष्ट केले की, या क्षेत्राला कायदेशीर चौकटीत आणण्यासाठी सरकार एका नियामक आराखड्यावर काम करत आहे.

# जलदगती न्यायालये कागदावरच, ४० टक्केच कार्यरत : मुख्यमंत्र्यांची माहिती, उच्च न्यायालयाकडे पाठपुरावा सुरू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मंजूर असलेल्या १३८ जलदगती न्यायालयांपैकी सध्या केवळ ५८ न्यायालये कार्यरत आहेत. उर्वरित न्यायालयांसाठी न्यायाधीशांची नियुक्ती सुनिश्चित करण्यासाठी राज्य सरकार मुंबई उच्च न्यायालयाशी सातत्याने पाठपुरावा करत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत दिली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, न्यायाधीशांची नियुक्ती करण्याचा अधिकार पूर्णपणे न्यायव्यवस्थेकडे आहे. दरम्यान, चर्चेत सहभाग घेताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नमूद केले की, कनिष्ठ न्यायव्यवस्थेतील मोठ्या प्रमाणावरील रिक्त पदांमुळे न्यायदानाच्या प्रक्रियेत विलंब होत आहे.

भाजपचे आमदार राहुल कुल यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, गेल्या वर्षभरात राज्य सरकारने मुख्य न्यायमूर्तींशी प्रत्यक्ष भेटी आणि अधिकृत पत्रव्यवहाराद्वारे अनेकदा न्यायाधीशांच्या नियुक्तीची विनंती केली आहे. पुणे आणि राज्यातील इतर भागांतील न्यायालयीन पायाभूत सुविधांबाबत बोलताना फडणवीस म्हणाले की, गेल्या १० ते १२ वर्षांत महाराष्ट्रात सत्र न्यायालये आणि अतिरिक्त जिल्हा न्यायालयांचा लक्षणीय विस्तार झाला आहे. जर पुणे किंवा इतर ठिकाणांहून नवीन न्यायालयांची मागणी आल्यास, प्रलंबित खटल्यांच्या आधारे त्यावर विचार करून नवीन न्यायालयांना मंजुरी दिली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# ईसमाची गळफास घेवुन आत्महत्या

### डॉ.शरद देशमुख स्मृति हॉस्पिटल परिसरातील घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शहरातील डॉ.शरद देशमुख स्मृति हॉस्पिटल परिसरातील रहिवाशी उमेश वसंतराव यावलकर यांनी गळफास घेवुन आत्महत्या केल्याची घटना आज दुपारच्या सुमारास उघडकीस आली.

सविस्तर माहीतीनुसार, मृतक उमेश यावलकर हे दोन मुली, पत्नीसह राहात होते. काही दिवसांपुर्वी दोन्ही मुली आणि पत्नी हे मामाच्या गावाला गेले होते, अशातच उमेश हे एकटेच घरामध्ये राहात होते. आज दुपारी २ च्या सुमारास त्यांच्या घरीच त्यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या स्थितीत आढळुन आला. त्यांनी गळफास केव्हा घेतला? याबाबत वृत्त लिहीस्तोवर माहीती मिळु शकली नाही. या प्रकरणी वरुड पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली असून घटनास्थळाचा पंचनामा करुन मृतदेह शवविच्छेदनाकरीता रवाना केला.



आज सायंकाळच्या सुमारास त्यांचा मृतदेहावर आप्तेष्ट, स्वकीय आणि नातेवाईकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने परिसरात शोक व्यक्त केल्या जात आहे. त्यांच्या मागे पत्नी, २ मुली असा परिवार आहे. त्यांनी आत्महत्या का केली? याबाबत माहीती मिळु शकली नाही.

# शरद पवार गट एनडीए सोबत?

### जयंत पाटील-विनोद तावडे भेटीने नवी चर्चा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांच्यातील बैठकीनंतर शरद पवारांचा गट केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीत (एनडीए) सहभागी होणार असल्याची जोरदार चर्चा सध्या राजकीय वतुर्ळात आहे. मात्र, ही प्रक्रिया नेमकी कधी होईल, याबाबत अजूनही स्पष्टता नाही. बहुचर्चित संभाव्य केंद्रीय मंत्रिमंडळाच्या विस्तार अथवा फेरबदलावेळी शरद पवार गट भाजप जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शिवसेना उबाठा आणि तृणमूल काँग्रेसच्या खासदारांमध्ये फूट पडल्यानंतर भाजपने आपले पुढील लक्ष राष्ट्रवादी शरद पवार गटावर केंद्रित केले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाने दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाला आता पूर्णविराम मिळाला आहे. त्यामुळे शरद पवार गटाच्या खासदार, आमदारांपैकी अनेक जण भाजपसोबत जाण्यासाठी आग्रही आहेत. शरद पवार गटाचे लोकसभेत ८ तर विधानसभेत १० आमदार आहेत. या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून शरद पवार आपला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करतील किंवा भाजपच्या नेतृत्वाखालील आघाडीचा भाग बनवतील, अशी चर्चा आहे.

# पुसलाच्या १७ वर्षीय वेदिकाचा संशयास्पद मृत्यू

### उलट-सुलट चर्चेला उधाण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील पुसला येथील पुनर्वसन वार्ड क्र.१ मध्ये एक धक्कादायक आणि दुर्दैवी घटना समोर आली आहे. येथे राहणाऱ्या वेदिका श्रीकांत बगाडे या १७ वर्षीय अल्पवयीन युवतीचा आज संशयास्पद मृत्यू झाल्याने पुसला ग्रामस्थांसह संपूर्ण वरुड तालुक्यात खळबळ उडाली असून उलट–सुलट चर्चेला उधाण आले आहे.



प्राथमिक माहितीनुसार, मृत वेदिका ही वरुड शहरातील महात्मा फुले महाविद्यालयात इयत्ता १२ वी मध्ये शिक्षण घेत होती. आज अचानक तिची प्रकृती बिघडल्याने किंवा काही संशयास्पद घटना घडल्याने तिला कुटुंबीयांनी व स्थानिक नागरिकांनी तातडीने वरुड शहरातील एका खाजगी रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले. मात्र, तिची गंभीर अवस्था पाहता पुढील उपचारासाठी तात्काळ वरुड येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. दुर्दैवाने, डॉक्टरांनी तपासून तिला मृत घोषित केले. युवतीचा मृत्यू नेमका कसा झाला? याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. शवविच्छेदन झाल्यानंतर आणि त्याचा अंतिम वैद्यकीय अहवाल प्राप्त झाल्यानंतरच तिच्या मृत्यूचे खरे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. या संशयास्पद मृत्यू प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत शेंदुरजनाघाट पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली आहेत. ठाणेदार राहुल गवई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक या प्रकरणाचा सखोल तपास करत आहे.

वेदिकाच्या मृत्यूमागे नक्की काय कारण होते? घातपात की अन्य काही? या सर्व बाजूंनी पोलीस चौकशी करत असून, लवकरच या घटनेचा खुलासा होण्याची शक्यता आहे. या घटनेमुळे बगाडे कुटुंबासह पुसला गावावर शोककळा पसरली आहे.




